**आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००१.

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ६४

दिनांक - ०३/१०/२०२५ वेळ :- सकाळी ११.०० वा.

| **अ.क्र** | **विषय क्र** | **विषय** |
|---|---|---|
| १ | ६०५ | अहिल्यानगर महानगरपालिका "आमदार स्थानिक विकास कार्यक्रम " सन २०२५-२०२६ अंतर्गत ई नि.क्र.१२१०७७८-१ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१ मधील स.नं.१२/३३/४+२३/१ अ येथील ओपन स्पेस विकसित करणे निविदेच्या मंजूरी बाबत. |
| २ | ६०६ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या कच-याची खाजगी यंत्रणेमार्फत संकलन,वर्गीकरण व वाहतुक करणेकामी ई निविदा क्र.१२१७३१७-१ सन २०२५-२६ निविदेमधील प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०५ | विषय क्र - ६०५

दिनांक :- ०३/१०/२०२५ | विभाग- सार्व.बांधकाम विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका "आमदार स्थानिक विकास कार्यक्रम " सन २०२५-२०२६ अंतर्गत ई नि.क्र.१२१०७७८-१ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१ मधील स.नं.१२/३३/४+२३/१ अ येथील ओपन स्पेस विकसित करणे निविदेच्या मंजूरी बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,प्रशासकिय मान्यता

जा.क्र. जिनिस /०/२०२५/Aug/AA०/०२६३७ दि.०८/८/२०२५

१. ई निविदा क्र १२१०७७८-१- सन २०२५-२०२६ (मनपाच्या संकेतस्थळावर दि.१३/०८/२०२५)

२.निविदा विक्री कालावधी :- दि.१३/०८/२०२५ ते २०/०८/२०२५

३. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. १३/०८/२०२५ ते २०/०८/२०२५

४.निविदा उघडण्याची तारीख :- दि.२२/०८/२०२५

५.कामाची मुदत : ०४ महीने.

दि.९-१०/०९-२०२५ रोजीच्या छाननी समितीचे शिफारशीनुसार

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त ) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला निविदा दर | सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ई निविदा १२१०७७८-१ | अहिल्यनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१ मधील स.नं.१२/३३/४+२३/१ अ येथील ओपन स्पेस विकसित करणे | ३१,७९,६६३/- | श्री.हर्षल विजय आगरवाल अहिल्यानगर<br>------------------<br>फिनिक्स एन्टरप्रायजेस अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा ०.०१% कमी दराने<br>---------<br>निविदा दरापेक्षा २.०% जादा दराने | श्री.हर्षल विजय आगरवाल अहिल्यानगर<br>-------------<br>निविदा दरापेक्षा ०.०१ % कमी दराने |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद निविदा धारक मे श्री.हर्षल विजय आगरवाल,अहिल्यानगर, यांची निविदा, निविदा दरापेक्षा ०.०१% कमी दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

निविदा धारक श्री.हर्षल विजय आगरवाल,अहिल्यानगर, यांच्या निविदा दरापेक्षा ०.०१% कमी निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६४**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०६ विषय क्र - ६०६

दिनांक :- ०३ /१०/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या कच-याची खाजगी यंत्रणेमार्फत संकलन,वर्गीकरण व वाहतुक करणेकामी ई निविदा क्र.१२१७३१७-१ सन २०२५-२६ निविदेमधील प्राप्त दरास मंजूरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या कच-याची खाजगी यंत्रणेमार्फत संकलन,वर्गीकरण व वाहतुक करणेकामी ई निविदा क्र.१२१७३१७-१ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ई - निविदेमध्ये दोन संस्थांनी सहभाग नोंदविलेला असून सदर निविदाकार संस्थांचे तांत्रिक लिफाफे उघडून प्राप्त कागदपत्रांची छानणी केली असता तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांच्या छानणीमध्ये दोन्ही संस्था पात्र ठरलेल्या असून मा.तांत्रिक छानणी समितीने दोन्ही संस्था पात्र ठरविल्यामुळे दोन्ही संस्थांचे व्यापारी लिफाफे उघडणेस शिफारस केलेली आहे.

त्याप्रमाणे ई - निविदेमधील सहभाग नोंदविलेल्या दोन्ही संस्थांचे व्यापारी लिफाफे उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे स्वयंभु ट्रन्सपोर्ट ,पुणे | रू.२६७५/- प्रति मे.टन | L-१ |
| २ | मे.अमृत एन्टरप्रायजेस,ठाणे | रू.२९१०/- प्रति मे.टन | L-२ |

मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे या संस्थेचे दर रक्कम रू.२६७५/- मे.टन लघुत्तम प्राप्त झाल्यामुळे त्यांना दि.१/१०/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता वाटाघाटीकरिता बोलविण्यात आलेले होते. परंतु ते समक्ष उपस्थित न रहाता त्यांनी पत्र सादर करून रक्कम रूपये २६५०/- या दाराने काम करण्यास तयार असलेबाबत नमूद केलेले आहे. तसेच दरांबाबत सविस्तर कारणे नमूद केले आहेत. सदर कारणामध्ये वेळोवेळी होणारी इंधन दरवाढ तसेच कामगारांच्या मानधनामध्ये होणारी वाढ तसेच वाहनांच्या स्पेअर पार्ट व कामाचा कालावधी लक्षात घेता संस्थेने सादर केलेले दर हे रास्त व बाजारभावाशी सुसंगत असलेबाबत नमुद केलेले आहे.

संस्थेच्या प्राप्त दराचे अवलोकन केले असता संस्थेने सादर केलेले दर हे मनपाने मंजूर केलेल्या तांत्रिक मान्यतेपेक्षा (रू.२३६३/- प्रति मे.टन) पेक्षा जास्त आहेत. शहरातील कचरा संकलन, वर्गीकरण,वाहतुक करणे या कामी ई निविदेस दोन वेळेस प्रतिसाद मिळाला नसल्याने निविदेची ही तीसरी वेळ आहे. विद्यमान कंत्राटदार सक्षमतेने काम करत नसल्यामुळे नागरीक,सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून मोठया प्रमाणात तक्रारी येत आहेत. उपरोक्त वस्तुस्थिती व व्यापक जनहित लक्षात घेता अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या कच-याची खाजगी यंत्रणेमार्फत कचरा संकलन,वर्गीकरण व वाहतुक करणेकामी ई निविदा क्र.१२१७३१७-१ सन २०२५-२६ निविदेमधील प्राप्त दरानुसारवाटाघाटी

अंती तीन वर्षा करिता निविदाकार  संस्था मे. स्वयंभू ट्रन्सपोर्ट पुणे ,यांच्या रक्कम रू.२६५०/- प्रति मे.टन या दरास मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

------------------------------------------------------------------------------------------

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |